धिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
30 OCT 1992

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. अेनअेपी १०९१/१५६११/[७५]/ल-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १९ ऑक्टोबर, १९९२.

विषय :- अकृषिक परवानगी

पूरनियंत्रण निर्बंधित क्षेत्रात बांधकामास प्रतिबंध करण्याबाबत

परिपत्रक

नियोजन विभागाने नियुक्त केलेल्या पाटबंधारे, लाभक्षेत्र विकास व पूरनियंत्रण या विषयासाठी नियुक्त केलेल्या अभ्यासगटाने पूरनियंत्रण कार्यक्रमात निर्बंधित क्षेत्र निश्चित झाल्यानंतर अशा क्षेत्रातील कोणत्याही बांधकामास निर्बंध होईल असे कायदे करून पुरापासून धोका असलेल्या भागातील बांधकामे नियंत्रित करून धोका टाळता येईल अशी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी व त्यासाठीचे नियम आणि उपरोक्त शिफारस यांचा एकत्रित विचार करता या शिफारसीचे अंमल-बजावणीसाठी या विभागाकडील कार्यवाहीसाठी नवीन कायदा करण्याची आवश्यकता नसल्याचे आढळून आले. कारण जमिनीच्या वापरात बदल करणे बाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ४४ [२] [क] मध्ये जिल्हाधिकारी, सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता आणि सोयी लक्षात घेऊन परवानगी नाकारु शकतात. अशी परवानगी नाकारताना त्यांची लेखी कारणे नमूद करणे मात्र आवश्यक आहे.

वरील तरतूद लक्षात घेऊन सर्व महसूल अधिका-यांना याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहेत की, पूरनियंत्रण कार्यक्रमात निर्बंधित क्षेत्र निश्चित झाल्यानंतर अशा क्षेत्रात बांधकामासाठी परवानगीचे अर्ज प्राप्त झाल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४४ [२] [क] मधील तरतुदींचा आवश्यक तेथे वापर करून पूररेषेच्या नदीकडील भागासाठी परवानगी देताना लेखी कारणे नमूद करून परवानगी नाकारण्यात यावी, असे करताना ज्या ठिकाणी महाराष्ट्र क्षेत्रीय नगर नियोजन [एम. आर. टी. पी. ] अधिनियम १९६६ मधील विकास प्राधिकारिणी अस्तित्वात असेल तेथे ह्या प्राधिकारिणीचे लक्ष वेधण्यात यावे व त्याचे अभिप्राय घेऊन उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

[ भा. सु. तायडे ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.